# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

## बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२ / अग्रहायण ३०, १९४४ (शके)

१५४ महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ (३) अन्वये मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता **श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव (स.) यांचे दालन क्रमांक १७-अ, विधान भवन, नागपूर** येथे संगणकीय आज्ञावलीद्वारे अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम काढण्यात आला आहे. निदेशानुसार सदरहु ठराव **शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी** खालीलप्रमाणे चर्चेला घेण्यात येणार आहेत :-

**(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) -**

(१) **श्री.सुरेश धस, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७२**

"राज्यातील अनुसूचित जमातीच्या जात पडताळणी समित्यांनी दिलेल्या निर्णयाला फक्त उच्च न्यायालयातच अपिल करता येत असल्याने अनेक प्रकरणे निर्णय देताना हेतुपुरस्पर, पुर्वग्रह दूषितपणे जाणीवपूर्वक विरोधात दिले गेल्याचे मा.उच्च न्यायालयात व मा.सर्वोच्च न्यायालयात वारंवार सिध्द होत असून अनेक प्रकरणी जात पडताळणी समित्यांना लाखांवर दंड, समज व निर्णय समितीच बरखास्त केल्याचे मा.उच्च न्यायालयाने/ मा.सर्वोच्च न्यायालयाचे शास्ती म्हणून आहे. अर्थपूर्ण तडजोडीमुळे तसेच राजकीय दबावाखाली येवून येथील निर्णय मोठ्या प्रमाणात बदलत असल्याचे निदर्शनास येत असल्याने संपूर्ण आदिवासी समाजात जात पडताळणी समितीचे कामकाज पक्षपातीपणे होत असल्याचा जनक्षोभ मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला आहे. खरा लाभार्थी वैधता प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये म्हणून राज्य शासनाने राज्यातील अनुसूचित जमातीच्या जातपडताळणी समित्यांवर न्यायाधिशांची नेमणूक करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(२) **श्री.नागोराव गाणार, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६७**

"राज्यात मान्यता प्राप्त अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवा महाराष्ट्र खासगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या) शर्ती, नियमावली, १९८१ मधील तरतुदींच्या अधीन आहे. या नियमावलीतील नियम क्रमांक १९ नूसार सेवा निवृत्ती वेतन (जुनी पेन्शन) व नियम २०(२) नुसार भविष्य निर्वाह निधी योजना शिक्षक व कर्मचाऱ्यांना देय असणे, परंतु दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० च्या निर्णयान्वये लागू केली असणे, तसेच १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी अंशतः अनुदानित शाळेत नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर यांना ही योजना लागू करणे, सदरहू योजनेतून नियत वयोमानापुर्वी बाहेर पडण्याची तरतुद असणे, तथापि अशाप्रकरणी कर्मचा-यांच्या खाती जमा झालेल्या एकूण रक्कमेच्या ४० टक्के रक्कम वार्षिक (अँन्युईटी) खरेदी करण्यासाठी गुंतविणे अनिवार्य असल्याने राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांमध्ये प्रचंड असंतोष असणे, कर्मचा-यांचा एकूण कल पाहता राज्यातील १०० टक्के अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना लागू असलेली अंशदान निवृती वेतन योजना रद्द करुन त्याऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ अन्वये लागू असलेली पूर्वीची निवृत्ती वेतन योजना दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना लागू करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(3) **श्री.रामदास आंबटकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ९**

"राज्यात विशेषत: विदर्भातील अपूर्ण प्रकल्पांची स्थिती, विदर्भात प्रामुख्याने छोटे-मोठे प्रकल्प गेल्या २० वर्षापासून मंजूर असूनही अद्याप बऱ्याच प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली नाहीत, अपुऱ्या अनुशेषा अभावी भुसंपादन व पर्यावरण विषयक बाबींमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या, अनेक सिंचन प्रकल्प प्रलंबित आहेत, विदर्भात प्रकल्पांची प्रलंबित कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४) **श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २३**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी तरुणांमध्ये निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थांकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडवण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तींना रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस हि विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५) **श्री.जयंत आसगांवकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ४४**

"राज्यातील विनाअनुदान तत्वावरील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : २१ डिसेंबर, २०२२

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

**<u>याची प्रत :-</u>**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
६) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, विधान भवन, नागपूर
७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
८) संगणक कक्ष (संकेतस्थळ)
९) एम.के.सी.एल.कक्ष (आज्ञावली)